International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# महिला सबलीकरण आणि भारतीय संसद मधील महिला सहभाग – (कालखंड –2014 ते 2024)

**डॉ. रमेश म. नगराळे**
*(सहा. प्राध्यापक CHB), राज्यशास्त्र विभाग.*
*श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय पुसद, जि. यवतमाळ.*
*Corresponding Author – डॉ. रमेश म. नगराळे*
**DOI - 10.5281/zenodo.15240978**

**सारांश:**

*महिला सक्षमीकरण हे पुरुष व महिला यांना समान अधिकार संधी देणे म्हणजे महिलांचे सबलीकरण होय. महिला ही सर्व कार्य करण्यात सक्षम आहेत. त्यांना त्यासाठी अधिकार संधी देणे म्हणजे सबलीकरण काही संधी अधिकारांपासून वंचित असलेल्या महिलांना त्या संधी अधिक देऊन सक्षम बनवणे विकास घडवून आणणे वंचित राहिलेला घटक म्हणजे महिला यांना विकासाच्या प्रवाहात आणणे म्हणजेच सबलीकरण होईल पूर्ण विकास पूर्ण अधिकार प्राप्त करण्यासाठी भारतात महिला अधिकार. संधी व अधिकार पासून वंचित होत्या त्यांना संविधानाने अधिकार बहाल केला आहे. तरी पण काही परिस्थितीमध्ये ज्या महिलां सबलीकरण झाले नाही. अधिकारापासून वंचित आहे. त्यांना करिता शासन स्तरावरील प्रयत्न होताना दिसते. महिला सबलीकरण होण्यासाठी आर्थिक ,शैक्षणिक, धार्मिक,सामाजिक, राजकीय अधिकाराची जागृती तसेच शासन अधिक धोरण राबवून प्रयत्न करण्याची गरज आजच्या परिस्थितीमध्ये असल्याचे वाटते.*

**प्रस्तावना:**

निसर्गाने मानवाची निर्मिती केली आहे. त्यामध्ये स्त्री- पुरुष दोन्ही समान असून ते मानवप्राणी आहेत. मनुष्याला ने जीवन जगण्या येण्यासाठी आपले आयुष्य सुख समाधानी राज्यात जगता येण्यासाठी महिलांना पुरुषांना समान अधिकार व संधी देणे महत्त्वाचे असतात भारतात प्राचीन काळात स्त्री व पुरुषांना अधिकार असल्याचे दिसून येते. पुरुषांना अधिकार सर्व क्षेत्रात होता. प्राचीन काळामध्ये हे जशी सामाजिक जीवनात राज्यक्षेत्रात महिलांना अधिकार होते. वैदिक काळात स्त्रिया जसे गार्गी,मैत्रिय, लोपामुद्रा, विदुषी या स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार होता. तसेच विद्वत्त सभेत त्यांना मानाचे स्थान होते.बौद्ध कालखंडात, जैन कालखंडात तसेच 16 जनपदांमध्ये अधिकार प्राप्त होता .असे दिसून येते. पण मध्य काळात स्त्रियांना अधिकार नव्हते.परकीय आक्रमण तसेच अनेक राजकीय सत्तांतर झाले. त्या काळात स्त्रियांना दुय्यम स्थान प्राप्त झाले. कुठलेही अधिकार त्यांना नव्हते. अन्याय अत्याचार त्यांच्यावर होत होता व चूल व मूल या क्षेत्रापर्यंत मर्यादित होते. मनुष्य असले, तरीही त्यांना अधिकार नव्हता. सम्राट अशोकांच्या काळात तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात स्त्रियांना सन्मानाने वागणूक दिले जात असे. हा कालखंडात सोडला तर नंतरच्या कालखंड स्त्रियांना पुरुषाच्या तुलनेत दुय्यम स्थान प्राप्त झाले होते असे दिसून येते. भारतात इंग्रजांचे राज्य असताना स्त्रियांना दुय्यम स्थान होते.भारतीय समाजातील स्त्रियांचे जीवन अत्यंत

कठीण होते. पुढे कुठेही अधिकार नव्हता. स्त्री ही घरातच चार भिंतीतच तिचे जग होते. 18 वे शतकाच्या शेवटी 19 व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात इंग्रजांनी शिक्षणामुळे आणि भारतीय थोर महापुरुष छत्रपती राजर्षी शाहू महाराज,सयाजीराव गायकवाड, महात्मा ज्योतिराव फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,आगरकर,महर्षी कर्वे, राजाराम मोहन राय या समाजसुधारकांनी समाज जागृती व स्त्रियांना पुरुषांना बरोबरीने स्वातंत्र्य अधिकार व संधी देण्यासाठी महान योगदान दिले. इंग्रजांना कायदे करण्यास भाग पाडले. तसेच समानतेच्या संबंधित त्यांनी विचार मांडले. आज स्त्री- पुरुष समानतेसाठी आवश्यक उपाय योजना कायदेशीर आहेत. भारतात संविधान 26 जानेवारी 1950 पासून लागू झाले. व त्यानुसार सर्व स्त्री-पुरुषांना समान कायदेशीर अधिकार बहाल करण्यात आले. राजकीय अधिकार, सामाजिक अधिकार, आर्थिक अधिकार देण्यात आले. तरी काही परिस्थितीमध्ये महिला ही विकासापासून व आपल्या अधिकार कर्तव्या पासून दूर राहिलेले दिसून येते.आज साक्षरता दर 65.46%आहे .स्त्रियांचा पुरुषांपेक्षा लिंग गुणोत्तर 943 आहे व माता मृत्यूदर,रोजगाराची स्त्री पुरुष तुलनेत स्थिती स्त्रियांची प्रमाण कमी आहेत. आजही त्यांच्यावरील अन्याय अत्याचार होताना दिसून येते. म्हणून शासनाने अनेक वेळोवेळी कायदे, नियम, धोरण,महिला सक्षमीकरणासाठी केलेल्या दिसते. सर्व समान महिला सक्षमीकरणासाठी केलेल्या दिसते.सर्व स्त्री-पुरुषांना समानतेतून आजच्या स्थितीत महिला सक्षमीकरण पूर्णपणे होणे महत्त्वाचे आहे. त्यांचे शिक्षण,आरोग्य, आर्थिक स्थिती, सामाजिक स्थिती तसेच सुधारणे त्यांच्यावरील अन्याय पूर्णपणे नष्ट होणे म्हणजेच महिला.सक्षमीकरण म्हणता येईल प्रस्तुत शोधनिबंधातून महिला सक्षमीकरण व राजकीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून भारतीय संसदेतील महिलांच्या सहभागाचे विश्लेषण पुढील प्रमाणे करण्यात आले आहे.

**उद्देश व महत्व:**

महिला- पुरुष हे दोन्ही समान असून मानव आहेत. मानवा सारखेच माणूस त्यांना अधिकार- संधीसमान असल्या पाहिजेत. समाज जीवनात प्रत्येक व्यक्तीला विकास साध्य करता यावा. तसेच प्रत्येकाचे जीवन वैयक्तिक व प्रगती व सामूहिक प्रगती व्हावी. याकरिता अधिकार प्रदान केलेले.असे दिसून येते. भारतात स्त्री-पुरुष काळा -काळा नुसार त्यांची स्थिती वेगळी दिसून येते. महिलांना दुय्यम स्थान प्राप्त झाले होते. त्यांना अधिकारापासून वंचित करण्यात आले होते. नंतर संविधानिक प्रावधानानुसार त्यांना अधिकार प्रदान करून त्यांचे जीवन सक्षम केले. भारतात काही महापुरुषांच्या प्रयत्नाने महिलांना जीवन सक्षम बनल्याचे दिसून येते. त्या संबंधित आज महिला कितपत सक्षम आहे. किंवा त्यां अधिकारापासून वंचित राहिल्या का? तसेच शासनाचे प्रयत्न सक्षमीकरणा संबंधित काय आहेत. याचे अध्ययन करणे प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश व महत्त्व आहे.

**गृहीतके:**

1) महिलांना संविधानातील राजकीय अधिकार देणे म्हणजे सक्षमीकरण आहे.
2) संसदेमधील महिलांचा सहभागांचे प्रमाण कमी आहे.
3) अधिकार व संधी असून वंचित असलेल्या महिलांना सक्षमीकरणाच्या प्रवाहात आणणे आवश्यक आहे.

**संशोधन पद्धती व मर्यादा:**

प्रस्तुत शोधनिबंध महिला सक्षमीकरण आणि राजकीय अधिकारी यांच्या माध्यमातून भारतीय संसदेमधील सहभागांचे अध्ययन करताना विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला असून दुय्यम तथ्य संकलन करून तथ्य विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच भारतीय संसदेमधील 2014 ते 2024 पर्यंत महिलांच्या सहभागांचे अध्ययन मर्यादा क्षेत्र आहेत.

**महिला सबलीकरण स्वरूप:**

भारतात महिला सबलीकरण होताना अनेक महापुरुषांचे योगदान लाभले.राजर्षी शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड महाराज महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजाराम मोहन राय, महर्षी कर्वे,आगरकर यांच्या कार्य व प्रेरणेने सबलीकरण सुरुवात झाली. महिलांचा विकास साध्य व्हावा ते संपूर्ण आयुष्य जगता यावे,आर्थिक सक्षम बनवणे, सामाजिक दर्जा उंचवावे महिलांचा विकास व ते संपूर्ण आयुष्य जगता यावे. आर्थिक सक्षम बनवणे सामाजिक दर्जा उंचावर आणि सक्षमीकरण होय कुठलाही क्षेत्रात त्यांना संधी असावे. तेव्हा सक्षमीकरण म्हणता येईल सक्षमीकरण म्हणजे सर्व क्षेत्रांमध्ये जसे सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक यामध्ये पुरुषांच्या बरोबरीने अधिकार व संधी देणे, व विकास साध्य करणे स्त्री पुरुष असमानता नष्ट करण्याची प्रक्रिया म्हणजे महिला सक्षमीकरण होय.सबलीकरण एक प्रकारे सक्षमबाजू बनवून सर्व क्षेत्रात समानता आणणे सर्व क्षेत्रात पुरुष महिला कार्य करण्यास संधी देणे म्हणजे सबलीकरण होय. महिला कार्य करण्यास कुठेही कमी नसते. त्यांच्यात क्षमता आहेत. फक्त त्यांना संधी व अधिकार देण्याची आवश्यकता असते. आणि ते संधी किंवा अधिकार देणे म्हणजे सक्षमीकरण आहे. अनेक काळापासून त्या संधी पासून वंचित होत्या त्यांना पुन्हा विकासाच्या प्रवाहात आणणे त्यासाठी अधिकार देणे म्हणजे सबलीकरण होय.

महिला सबलीकरणाची आंतरराष्ट्रीय स्तरावरील 1948 मध्ये UNO मानवी हक्क जाहीरनामा स्वीकारला यामध्ये महिलांना समान अधिकार प्रदान केले गेले. जवळजवळ सर्व देशात महिलांना समान अधिकार देण्यासाठी व सक्षमीकरण करण्याची प्रक्रिया सुरू झाली. भारतामध्ये अनेक महापुरुषांच्या कार्याने महिला सक्षमीकरण करण्यात आले आहे. भारतीय संविधानाने 26 जानेवारी 1950 पासून स्त्री-पुरुषांना समान अधिकार प्रदान करून त्यांना सक्षम बनविले . त्यांना अनेक अधिकार प्रदान केले म्हणजे सक्षमीकरण होय.

**संविधानिक राजकीय अधिकार:**

भारतीय संविधानाने महिलांना अनेक राजकीय सामाजिक, आर्थिक अधिकार दिला. त्यामध्ये महत्त्वाचा म्हणजे राजकीय अधिकार भारताच्या क्षेत्रात रहिवासी सर्व नागरिकांना हा अधिकार प्रदान केला आहे. भारतीय नागरिक असते त्याला भारतीय संविधानिक अधिकार प्राप्त होतात. मूलभूत हक्क तसेच राजकीय अधिकार होय. संविधानाच्या अनुच्छेद 5 ते 11 मध्ये नागरिकत्वाचा अधिकार सर्व भारतीयांना स्त्री-पुरुषांना प्रदान करण्यात आला. अनुच्छेद 14 मध्ये मूलभूत हक्कातील कायद्यापुढे सर्व समान स्त्री- पुरुष यांना अधिकार दिले.

अनुच्छेद 15 -16 मध्ये सर्व पदे राजकीय पदे प्राप्त करताना जात धर्म,पंथ, लिंग असा कोणताही भेदभाव करता येत नाही. म्हणजे पुरुष व महिला यांना समान अधिकार प्राप्त आहे. अनुच्छेद 19 मध्ये स्वातंत्र्याचा अधिकार बहाल करण्यात आला. सर्व सभा संघटना स्थापन करणे व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य प्रदान करण्यात आला. स्त्री -पुरुष यांना समान राजकीय अधिकार दिले गेले.

तसेच संविधानाच्या भाग नऊ मध्ये पंचायती व भाग नऊ क मध्ये नगरपालिका अनुच्छेद 243 (घ) अनुच्छेद 243 (न) मध्ये जागांचे वाटप आरक्षण महिलांना देण्यात आल्याचे दिसते. भाग पंधरा मध्ये अनुच्छेद 325 मध्ये सर्व भारतीय स्त्री-पुरुषांना मतदार यादीत समावेश करण्यात आला आहे. म्हणजे भारतीय संविधानिक राजकीय अधिकार महिलांना पुरुषांच्या बरोबरीने समान दिलेला आहे. याच अधिकारांच्या माध्यमाने महिलांचा विकास साध्य होतो. आजपर्यंत महिलांचा सहभाग राजकीय व इतर क्षेत्रात असलेला दिसतो. तो संविधानिक अधिकारामुळेच हेच एक महिलांचे पूर्ण सक्षमीकरण आहे असे वाटते.

**भारतीय संसदेमधील महिलांचा सहभाग:**

भारतीय संसदेमधील 2014 मध्ये 16 वी, 2019 मध्ये. 17 वी, आणि 2024 मध्ये 18 वी सार्वत्रिक निवडणुकांमध्ये लोकसभेमध्ये महिला प्रतिनिधींची संख्या व प्रमाण पुढीलप्रमाणे दिसून येते.

| अक्र | निवडणूका | एकूण प्रतिनिधी | महिला प्रतिनिधी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1) | १६ वी लोकसभा २०१४ | ५४३ | ६६ | १२६. |
| 2) | १७ वी लोकसभा २०१९ | ५४३ | ७९ | १४४. |
| 3) | १८ वी लोकसभा २०२४ | ५४३ | ७८ | १३६. |

वरील तक्ता वरून असे लक्षात येते की 16 वी लोकसभेमध्ये एकूण सदस्य 543 पैकी महिला सदस्य 66 निवडून आल्या तसेच 12%टक्केवारी आहेत. 17 वी लोकसभा 2019 मध्येमध्ये 79 महिला सदस्य 66 निवडून आल्या होत्या . 2024 मध्ये 18 वी निवडणूकमध्ये 543 पैकी 78 महिला सदस्य निवडून आल्या टक्केवारी 14 आहेत. म्हणजे राजकीय अधिकार असून पुरुषांपेक्षा महिला कमी निवडून आलेल्या दिसते टक्केवारी प्रमाण सुद्धा फार कमी दिसते.

**2024 या वर्षी संसदेमधील (लोकसभा व राज्यसभा) महिला सहभाग.**

| अक्र | सभागृह | एकूण प्रतिनिधी | महिला प्रतिनिधी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1) | लोकसभा | ५४३ | ७८ | १ ३.६ |
| 2) | राज्यसभा | २५० | २४ | ९.६ |

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की 2024 या वर्षी संसदेमधील महिला सहभाग लोकसभा व राज्यसभा लोकसभेत 543 जागा असून त्यापैकी 78 महिला प्रतिनिधी निवडून आले आहे. टक्केवारी 13.6 आहे . तसेच राज्यसभा मध्ये एकूण सदस्य 250 असून त्यापैकी 24 महिला प्रतिनिधी निवडून आले आहे. टक्केवारी 9.6 आहे. अजूनही महिलांचा विकास पूर्णपणे झालेला नाही. पूर्णपणे त्यांचे सबलीकरण झाले नाहीअसे दिसून येते.

**महिला सबलीकरणाच्या अनुषंगाने शासकीय धोरण:**

आंतरराष्ट्रीय पातळीवर संयुक्त राष्ट्र संघाने 1948 मध्ये मानवी हक्क जाहीरनामा मध्ये महिलांच्या विकासासाठी पावले उचलले व प्रथमच 1975 मध्ये आंतरराष्ट्रीय महिला वर्ष घोषित करण्यात आले. शाश्वत विकासाच्या उद्दिष्ट 2030 पर्यंत गरिबी, असमानता, महिला हिंसाचार नष्ट करण्याचे उद्दिष्ट स्स्वीकारल्याचे दिसते. राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय महिला आयोग 1993 महिला न्याय देण्यासाठी स्थापन करण्यात आले.तसेच शासनाने National policy for the Empowerment of Woman (2001) NPEW.तयार केल्याचे दिसून येते. महिला सबलीकरण करण्यासाठी अनेक कायदेशीर प्रावधान आहेत. अनेक महापुरुषांच्या योगदानाने सबलीकरण प्रवाहाला गतिशीलता प्राप्त झाली आहे. संविधानिक अधिकार प्रदान केले गेले, तरी आजच्या स्थितीमध्ये

महिला विकास पूर्णपणे झालेला नाही. पूर्णपणे व त्यांची सबलीकरण झाले नाही असे दिसून येते.

वर्तमानपत्राद्वारे बातम्या द्वारे लक्षात येते की महिलावर अन्याय अत्याचार होत आहे. तसेच त्यां आर्थिक सक्षम झाल्या नाही म्हणून त्या करिता शासकीय प्रयत्न होताना दिसते.

महिला सबलीकरण होण्यासाठी काही शासकीय धोरणे योजना आखून त्यांची अंमलबजावणी होताना दिसते. तसे केंद्र सरकार शासनाकडून योजना राबवीत असते. केंद्र सरकार कडून पूरक आहार योजना, विशेष आहार कार्यक्रम ,एकात्मिक महिला सबलीकरण कार्यक्रम (Integrated women's Empowerment programmes)IWEP 2001,महिला सबलीकरण वर्ष 2001 मध्ये घोषणा करून धोरण आखून शिक्षणाला प्रोत्साहन दिले. महाराष्ट्र राज्य मध्ये राज्य महिला आयोग स्थापन करण्यात आले. महिलांच्या विकासासाठी महिला धोरण 1994 मध्ये तसेच महिला धोरण 2001, Maharashtra state woman policy 2014 मध्ये तयार करण्यात आले.

तसेच महाराष्ट्र शासनाच्या काही योजना बेटी बचाव बेटी पढाव योजना, मनोधैर्य योजना, माझी कन्या भाग्यश्री, जिजाऊ वस्तीगृह, अल्पसंख्यांक मुलीचे वस्तीगृह, सामाजिक न्याय विभागाचे योजना, मुख्यमंत्री लाडकी बहिणी योजना, इत्यादी महाराष्ट्र शासनाकडून योजना राबविल्याचे दिसते. केंद्र शासनाकडून 1993 मध्ये 73 वी घटना दुरुस्ती करून पंचायत राज मध्ये महिलांना 33% आरक्षण दिले. 2009 मध्ये 50% ममहिलांना पंचायत राज मध्ये आरक्षण दिले. स्थानिक स्वराज्य संस्थेत 50 टक्के आरक्षण आहेत. 2024 मध्ये केंद्र शासनाने महिलांना लोकसभा, विधानसभा मध्ये 33% आरक्षण विधेयक (नारी शक्ती वंदन विधेयक) पारित केल्याचे दिसते. इत्यादी धोरणे, नियम केंद्र शासनाकडून महिला साठी राबविले दिसते ते म्हणजे महिला सबलीकरणासाठी आहेत.

**गृहीतकाची तपासणी**:

1) महिलांना संविधानातील राजकीय अधिकार देणे म्हणजे सक्षमीकरण आहे. वरील गृहीतक सिद्ध होते. महिलांना संविधानिक सर्व अधिकार दिल्यामुळे सक्षमीकरण होत आहे.
2) संसदेमधील महिलांचा सहभागांचे प्रमाण कमी आहे.

वरील गृहीतक सिद्ध होते. लोकसभेतील महिलां प्रतिनिधी प्रमाण पाहता महिलांचे प्रमाण अगदी 12% 13 % 14.% लोकसभेतील अगदी कमीच आहेत.

3) अधिकार व संधी असून वंचित असलेल्या महिलांना सक्षमीकरणाच्या प्रवाहात आणणे आवश्यक आहे. वरील गृहीतक सिद्ध होते. अधिकारापासून वंचित असलेल्या महिलांना अधिकारची जाणीव निर्माण करून त्यांना सक्षम बनवण्याची गरज आहे.

**निष्कर्ष:**

सबलीकरण हे फक्त अधिकार देऊनच होणार नाहीत, तर त्या अधिकाराची अंमलबजावणी पूर्णपणे शासन स्तरावर होणे गरजेचे आहे. महिला सबलीकरण करण्यास महत्त्वाचे पुरुष व महिला दोन्ही घटकांना समानतेची व भावना निर्माण झाली पाहिजे .आर्थिक क्षेत्र, कृषी क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, राजकीय क्षेत्र,धार्मिक क्षेत्रात सर्व कार्य करण्यात सक्षम आहेत. त्यांना अनेक अधिकार देणे होय .तेव्हाच पूर्ण सक्षमीकरण झाले असे म्हणता येईल. फक्त राजकीय क्षेत्रात जसे संसदेमधील राजकीय अधिकार असून सुद्धा महिला प्रतिनिधी पुरुषाचे तुलनेच बरेच प्रमाण कमी असल्याचे दिसते.आजच्या स्थितीला संविधानिक आरक्षण 33% महिलांना संसदेमध्ये आहे. नारी शक्ती वंदन कायद्यानुसार तसेच पंचायतराज स्तरावरील 50% आरक्षण आहेत महिला पूर्णपणे 50% आरक्षण असून, सुद्धा महिला पूर्ण सक्षम झालेल्या दिसत नाही. तसेच यासंबंधित संशोधन करण्याची गरज वाटते. पण महिला

सक्षम करण्यात बनण्यास अधिक प्रयत्न करण्यात यावे असे वाटते.

### संदर्भ ग्रंथ सूची:


1. भारताचे संविधान (मराठी)– भारत सरकार विधी व न्याय मंत्रालय महाराष्ट्र शासन द्वाराप्रकाशन.
2. साबळे डॉ.आर. डी.- भारतीय राजकीय विचार - पहिली आवृत्ती 2003 हिमालय पब्लिकेशन हाऊस मुंबई.
3. wikipedia
4. www.loksabha.in
5. www.rajyasabha.in
6. www. election commission.
7. National policy for the Woman (2016 draft).
8. Maharashtra state woman policy (2014).